# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९०००७.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Website : www.dtemaharashtra.gov.in


अधिसूचना

जा.क्र.१०/एडीएम/पदविका/प्रवेश प्रक्रिया/२०१८-१९/ ७७६

दिनांक : 12 JUL 2018

विषय:- प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम, थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम व प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज ऑनलाईन नोंदणी करण्याची तारीख वाढविणेबाबत...

सदंर्भ:- १. प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे नोटिफिकेशन क्रमांक CETCELL/Diploma-Admission Notice/Poly२०१८/८४८ दि. १९.०६.२०१८.

२. थेट व्दितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे नोटिफिकेशन क्रमांक CETCELL/Diploma-Admission Notice/DSD२०१८/८४९ दि. १९.०६.२०१८.

३. प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी पदविका अभ्यासक्रमाचे नोटिफिकेशन क्रमांक CETCELL/Diploma-Admission Notice/PostHSC२०१८/८५० दि. १९.०६.२०१८.

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधिन नोटिफिकेशनच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी, थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी व प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका अभ्यासक्रमाकरिता विद्यार्थ्यांचे ऑनलाईन प्रवेश अर्ज नोंदणी करण्याची कार्यवाही सुरु आहे. परंतु मागील ३-४ दिवसापासुन झालेल्या अतिवृष्टीमुळे विद्यार्थी सुविधा केंद्राकडे जाऊन ऑनलाईन प्रवेश अर्ज नोंदणी करुन शकले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितास्तव ऑनलाईन प्रवेश अर्ज नोंदणी करण्याची तारीख वाढवुन देणेबाबत काही संस्थांनी पत्राव्दारे या संचालनालयास विनंती केली आहे. सदरच्या विनंतीनुसार पदविका अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन प्रवेश अर्ज नोंदणी करण्याचा दिनांक पुढीलप्रमाणे वाढविण्यात येत आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | तपशिल | ऑनलाईन प्रवेश अर्ज नोंदणीचा आधीचा अंतिम दिनांक | ऑनलाईन प्रवेश अर्ज नोंदणीचा सुधारित अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम | Online registration of application and uploading of required documents by the Candidate for admission on website (For Maharashtra State/OMS/ J&K Migrant candidates | १६.०७.२०१८ | २०.०७.२०१८ |
| २ | थेट व्दितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम | Online registration of application and uploading of required documents by the Candidate for admission on website (For Maharashtra State/All India candidates) | १२.०७.२०१८ | १६.०७.२०१८ |
| ३ | प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. पदविका औषधनिर्माणशास्त्र, | Online registration of application and uploading of required documents by the | १७.०७.२०१८ | १९.०७.२०१८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी, एच.एम.सी.टी. अभ्यासक्रम | Candidate for admission on website (For Maharashtra State/All India/ J&K Migrant candidates | | |

तसेच पुढील प्रवेशाचे सुधारीत वेळापत्रक स्वतंत्रपणे या संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

( डॉ अभय वाघ )
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई

**प्रत:- माहितीस्तव सविनय सादर.**
१) मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
**प्रत:- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.**
१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे यांना कळविण्यात येते की, वर नमुद बदल आपल्या विभागातंर्गत असलेल्या सर्व सुविधा केंद्र (F.C.)/प्रवेश निश्चिती केंद्र (ARC)/पालक/विद्यार्थी यांना निदर्शनास आणुन देण्यात यावी.
२) कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुबई यांना कळविण्यात येते की, सदर पत्र या संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
३) कार्यासन क्रमांक २ व २ अ, मुख्य कार्यालय, मुंबई
४) प्राचार्य/संचालक, शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था.
५) संबधित सुविधा केंद्र (F.C.)/प्रवेश निश्चिती केंद्र (ARC)/पालक/विद्यार्थी
६) निवड नस्ती